अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १७ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## आता रेल्वेच्या वेटिंग लिस्टची झंझट संपणार

**नवी दिल्ली** : वेटिंग लिस्टची झंझट संपवण्यासाठी रेल्वेने एक योजना तयार केली आहे. त्यासाठी रेल्वे एक लाख कोटींचा खर्च करणार आहे.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, प्रतीक्षा यादीचा त्रास दूर करण्यासाठी भारतीय रेल्वे या मेगा योजनेवर काम करत आहे. या योजनेवर एक लाख कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. वर्षानुवर्षे धावणाऱ्या गाड्यांचे जुने कोच बदलण्यात येणार आहे. यामुळे रेल्वेच्या ताफ्यात ७ हजार ते ८ हजार नवीन गाड्यांचा समावेश होणार असल्याचे त्यांनी म्हटले. येत्या काही वर्षांत जुन्या गाड्या बदलून नव्या गाड्या आणल्या जातील. त्याचबरोबर प्रवाशांसाठी पुरेशा जागा उपलब्ध असतील असेही त्यांनी म्हटले. गाड्यांची संख्या वाढल्याने जागांची उपलब्धता वाढेल. गाड्यांची संख्या वाढली की कन्फर्म तिकीट मिळण्याची शक्यता वाढते. सध्या दररोज २ कोटींहून अधिक प्रवासी ट्रेनमधून प्रवास करतात. रेल्वे दररोज १०७५४ फेऱ्या चालवते. गाड्यांची संख्या वाढल्याने फेऱ्यांची संख्या वाढेल. यामध्ये दररोज ३००० जादा फेऱ्यांची भर पडल्यास वेटिंग लिस्टचा त्रास संपेल. ७०० कोटी लोक दरवर्षी रेल्वेने प्रवास करतात. २०३० पर्यंत हा आकडा १००० कोटींवर पोहोचेल. प्रवासी संख्या वाढल्याने गाड्यांची संख्याही वाढवणे गरजेचे आहे.



# पंढरीत पुन्हा 'मोहरा' खळखळणार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**पंढरीतील सावळ्या विठ्ठलाच्या नगरीत भक्तांची सदैव रेलचेल असते. वाळवंट दिंड्या-पताकांनी रोज दुमदुमलेले असते. वर्षातील चार मोठ्या वारींना तर वैष्णवांची मांदियाळीच असते. यंदाच्या डिसेंबर महिन्याचे वैशिष्ट्य म्हणजे वर्षाच्या सरत्या आठवड्यात पंढपूरला आषाढी यात्रेप्रमाणेच रूप प्राप्त होणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासन आणि स्थानिक संघटनांकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे. २५ ते १ जानेवारीपर्यंत इथे दोन मोठे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यासाठी १० लाख भाविक येण्याचा अंदाज आहे. त्यातून पंढरीत मोहरा खळखळतील, असे जाणकारांनी सांगितले.**

एका बाजूला नाताळच्या सुट्ट्या सुरू होत असल्याने २५ डिसेंबरपासून पंढरपुरात पर्यटकांची मोठी गर्दी होणार आहे. ज्येष्ठ शिवपुराण महात्म कथाकार प्रदीप मिश्रा यांचा २५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत धार्मिक कार्यक्रम होत असल्याने देशभरातून ८ ते १० लाख भाविक पंढरपूरमध्ये येतील, असा अंदाज आहे.

याचवेळी राधाकृष्ण महाराजांसह देशातील अनेक मान्यवर संत मंडळींच्या उपस्थितीत रस महोत्सव हा दुसरा कार्यक्रम २६ डिसेंबर ते १ जानेवारी या काळात होणार असल्याने यासाठी देखील हजारोंच्या संख्येने मारवाडी समाज पंढरपूरमध्ये येणार आहे. यामुळे २५ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत पंढरपूरमध्ये आषाढी सारखी गर्दी होणार आहे . या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाने दर्शन रांगेसाठी गोपाळपूर भागात १० पत्राशेड उभारणीचे काम सुरू केले आहे. याशिवाय पोलीस आणि महसूल प्रशासनानेही येणाऱ्या भाविकांच्या संख्येमुळे जादाच्या तयारीचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.

## विठुराया परत पाहाणार 'आषाढी' दोन कार्यक्रमांची सुरूय लगबग




परमपूज्य प्रदीप मिश्रा



राधाकृष्ण महाराज

### पाटलांचा मोठेपणा



पंढरपूर हे मोठे तीर्थक्षेत्र असल्याने देवाच्या दारात या कार्यक्रमाला उपस्थिती लावण्यासाठी देशभरातून लाखोंच्या संख्येने समाज जमा होणार आहे. यासाठी चंद्रभागा बस स्टॅन्डच्या विशाल मैदानावर सध्या मंडप उभारणीच्या कामास सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाची जबाबदारी राष्ट्रवादीचे नेते आणि विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी घेतली आहे.



### मस्तकी शिवलिंग



उत्तर भारतात अतिशय लोकप्रिय असणारे पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवपुराण महात्म्य ऐकण्यासाठी ठिकठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक येत असतात. विठुरायाच्या मस्तकी शिवलिंग असल्याने विठुराया हा हरिहर रूपात उभा आहे. याचमुळे पंढरपुरात आपला कार्यक्रम करण्याची महाराजांची अनेक वर्षाची इच्छा होती. यासाठी यावर्षी जानेवारी महिन्यात परभणी येथील कार्यक्रमात ही इच्छा त्यांनी खासदार बंडू जाधव यांना बोलून दाखवल्यावर त्यांनी यासाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्याची तयारी दाखवली. यासाठी परभणी येथून अनेक व्यापारी या जेवणाच्या तयारीसाठी आठ दिवस आधीपासून पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत.

### मोहरा खळखळणार!

पंडित राधाकृष्ण महाराज यांचा रस महोत्सव मंदिराच्या भक्त निवासासमोर असणाऱ्या मातोश्री मनमाडकर मठाच्या विस्तीर्ण पटांगणात होणार आहे. एकाच वेळेत आठ दिवसांसाठी लाखोंच्या संख्येनं भाविक येणार असल्यानं दोन महिन्यांपूर्वीच शहरातील सर्व हॉटेल, लॉजेस, भक्तनिवास आणि धर्मशाळा बुक झाल्या आहेत. येणारे भाविक आता पंढरपुरात जागा नसल्याने आसपासच्या शहरात हॉटेल मिळविण्यासाठी धडपड करत आहेत. सध्या नाताळाच्या सुट्ट्या सुरु होणार असल्याने पंढरपुरातील गर्दी वाढत चालली असताना आता २५ डिसेंबरपासून आठ दिवस १० ते १२ लाख भाविक ७ दिवस राहण्यासाठी येणार असल्याने पंढरपुरात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार आहे.

## श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोरील रस्त्यासाठी १ कोटींचा निधी

- पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती
- आजपासून रस्त्याचे काम होणार सुरू

सुराज्य/सोलापूर

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोरील रस्त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करणार असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. जिल्हा नियोजन समितीमार्फत हा निधी दिला जाणार आहे.



सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांची यात्रा म्हणजे सोलापूर शहर जिल्ह्यासह महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील भाविकांसाठी मोठी पर्वणी असते. वक्फ बोर्डाचशी असलेल्या मतभेदामुळे श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोरील रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून थांबले होते. मात्र यावर आता तोडगा निघाल्यामुळे हा रस्ता नव्याने करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. श्री सिद्धरामेश्वर मंदिरासमोरील रस्ता सिमेंटचा बनवण्यात येणार असून यात्रेनंतर त्याचे काम सुरू होणार आहे. मात्र पुढील महिन्यात होणाऱ्या यात्रेदरम्यान भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी हा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात सुव्यवस्थित करावा, अशा सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिल्याचेही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. आज रविवारपासून या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात होणार असल्याचेही पालकमंत्री पाटील म्हणाले.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा रस्ता दुरुस्त करण्यासाठी पुढाकार घेतल्याने भाविकांची होणारी गैरसोय टळणार आहे.

## कुंभारी येथे विवाहित इसमाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

एका ४५ वर्षीय विवाहित मजुराने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना कुंभारी अश्विनी रुग्णालयासमोरील आनंद पंधे यांच्या विहिरीत आज शनिवारी दुपारी उघडकीस आली. राजू यादगिरी संभारंभ (वय ४५ रा. विडी घरकुल कुंभारी ता.द. सोलापूर) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेहअश्विनी रुग्णालयासमोरील आनंद पंधे यांच्या शेतातील विहिरीत पाण्यावर तरंगताना आढळून आला. मयताच्या पश्चात पत्नी आणि ३ मुली असून तो मजुरी करायचा. गुरुवारी संध्याकाळी तो घरात तक्रार करून गेला होता. अशी नोंद वळसंग पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार बनकर करीत आहेत.

## कारागृहात आरोपींचा स्वत:वर वार, रक्ताच्या थारोळ्यात आढळले

**बारामती कारागृहातील धक्कादायक प्रकार**

सुराज्य/पुणे

पुण्यातील बारामती येथील कारागृहातील उपहारगृहात दोघा आरोपींनी स्वतःवरच वार करून घेत स्वतःला गंभीर जखमी करुन घेतलं असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बारामती शहर पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अजयसिंह अर्जुनसिंग दुधाणे (रा. बहत्तर वस्ती, पाण्याच्या टाकीजवळ, पुणे) आणि बच्चनसिंग जोगिंदरसिंग भोड (रा. गोसावीवस्ती, बिराजदार वैदवाडी, पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात हवालदार किरण आवारे यांनी फिर्याद दिली. गुरुवारी (दि. १४) तारखेला ही घटना घडली.




आवारे यांना या दिवशी उपहारगृहात गार्ड अंमलदार म्हणून ड्युटी होती.

बराक क्र. ५ मध्ये न्यायालयीन कोठडीतील सात व पोलीस कोठडीतील पाच आरोपी बंदिस्त होते. चोरीच्या गुन्ह्यात अटकेत असलेल्या दुधाणे व भोड हे याच बराकीत होते. दुपारी बराकींची पोलीस पाहणी करत असताना हे दोघे आरोपी जखमी झालेले दिसले. त्यांच्या अंगातून रक्त येत होते. इतर आरोपींकडे चौकशी केली असता या दोघांनी स्वतःच शरीरावर कशाने तरी मारून घेत जखमी केल्याचे दिसून आले. पोलिसांनी तत्काळ या दोघांना सिल्व्हर ज्युबिली उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

**झटपट श्रीमंत होण्याच्या लालसेतूनच होतोय अशा फसवणुकीचा प्रकार**

## क्रिप्टो करन्सीद्वारे कोट्यवधींची फसवणूक

**पोलीस आयुक्तालयाकडे हजारो लोकांच्या तक्रारी दाखल**

सुराज्य/सोलापूर

सीसीएच ॲपद्वारे मागील वर्षभरात सोलापूरकरांची फसवणूक झाल्याची घटना ताजी असताना पुन्हा क्रिप्टो करन्सीद्वारे कोट्यावधींची फसवणूक झाल्याची माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी सोलापूरच्या पोलीस आयुक्तांकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. पोलीस आयुक्तांकडे दिलेल्या तक्रारीमध्ये सोनीटिक्स कंपनीचे नाव समोर येत आहे. शंभर दिवसात डबल पैसे देण्याचे गुंतवणूकदारांना आमिष दाखवून सोलापूर शहर व जिल्ह्यातील हजारो जणांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.सोनीटिक्स कंपनीचे संचालक, पार्टनर आणि एजंट यांचे गुंतवणूकदारांना प्रलोभन दाखवून शिववर्स क्रिप्टो कॉइनची निर्मिती करून अनेकांना भावनिक करून फसवणूक केल्याचा आरोप केला.



क्रिप्टो करन्सीद्वारे सोनीटिक्स कंपनीच्या माध्यमातून गुंतवणूक केलेल्या २ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक झाली असल्याची तक्रार सचिन पृथ्वीराज चौहान (मिथिलानगर, शेटे वस्ती) यांनी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. आयुक्तांकडून चौकशीसाठी हा अर्ज आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला आहे. वेगवेगळ्या तारखांना यूपीआयद्वारे, रोख अशी २ लाख ९० हजार रुपयांची गुंतवणूक केली आंहे. मोबाइलमध्ये कंपनीचे ॲप डाऊनलोड करून देऊन पैसे भरून घेतले. गुंतवणूक केलेल्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यासाठी पुणे येथील कार्यालयात गेल्यानंतर टाळाटाळ होत असल्याचे तक्रारी चौहानांनी म्हटले आहे.

### चिटींग आढळल्यास कारवाई करणार



क्रिप्टो करन्सी यात आर्थिक फसवणुक झाल्याच्या तक्रारी पोलिस आयुक्तालयात प्राप्त झाल्या आहेत. चौकशी करता त्या तक्रारी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केल्या आहेत. मात्र यात काही चीटिंग आढळल्यास कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. दरम्यान नागरिकांनी अशा बेकायदेशीररित्या गुंतवणुकीपासून दूर राहिले पाहिजे. शंभर दिवसात दाम दुप्पट ही निव्वळ शुद्ध फसवणूक आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझे शेअर मार्केटसारखे झाले आहे !

कल्याण

150-65-230


## खोके कमी पडले, आता मुंबई गिळायला निघालेत

सुराज्य/मुंबई

**बऱ्याच महिन्यांनी उद्धव गर्जना या राज्याला ऐकायला मिळाली.धारावीतील टीडीआर उद्योगपती गौतम अदानी यांना द्यायला विरोधक करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी शनिवारी धारावीत मोर्चाचे आयोजन केले होते.त्यानंतर झालेल्या सभेत महायुतीवर त्यांनी प्रहार चढवला. पन्नास खोके कमी पडायला लागली म्हणून धारावी आणि मुंबई गिळायला निघालेले आहेत, अशी टीका ठाकरेंनी महायुतीवर केली.**

### धारावीच्या मोर्चात उद्धव ठाकरेंचा सरकारवर हल्लाबोल

राज्यातील सरकार अदानीच्या दारी आहे. धारावीतील सर्व गोष्टींचा टीडीआर अदानींना देऊन टाकला आहे. शिवसेना यावेळी उद्धव ठाकरे यांनी धारावीच्या पुनर्विकासाचे काम अदानींना दिल्याच्या मुद्यावरुन हल्लाबोल केला. आज मुंबईतील मोजके कार्यकर्ते रस्त्यावर आलेलो आहोत. अदानींची दलाली घेतलीय त्या सुपारीबाजांना सांगतोय की हा आडकित्ता पाहा किती मोठा आहे. सब भूमी अदानी की होऊ देणार नाही, असे ठाकरेंनी ठणकावले. धारावीतील पात्र आणि अपात्र ठरवणारी पात्रे कोणती आहेत, असे ठाकरे म्हणाले. करोनाशी लढून जिंकणारी धारावी अदानीला शरण जाईल का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आता हे अपात्र आहेत त्यांना मिठागरात टाकणार म्हणजे तिथली जागा देखील अदानींना दिली जाईल. मिठागर पण अदानींना देऊन टाकताय का? असा सवाल ठाकरेंनी केला.



धारावीकरांना ५०० चौरस फुटाचे घर मिळाले पाहिजे. धारावीकरांना धारावीत घरे मिळाली पाहिजेत. धारावीचा विकास सरकारने केला पाहिजे. अदानींना ज्या सवलती दिल्या, त्या इतर कोणत्या बिल्डरला दिल्या आहेत, असा सवाल ठाकरेंनी केला. मुंबई महापालिकेच्या निवडणुका घेत नाहीत. विधानसभेत आम्ही सत्तेत आल्यानंतर अदानींचं काय करायचे ते बघून घेऊ, असे ठाकरे म्हणाले. घराला घर दिल्याशिवाय धारावीकरांना धक्का लागता कामा नये.



आज धारावीच्या लढ्याची सांगता नसून लढ्याची सुरुवात आहे. पोलिसांनी पण सरकार येतं आणि जातं याची देखील नोंद घ्यावी, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## नीलमनगर येथे गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : नीलमनगर परिसरातील थोबडे वस्तीत राहणाऱ्या प्रभाकर मोनप्पा सुतार (वय-३८) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास त्याने घरातील छताच्या लाकडी वाशाला लुंगीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले. याची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून, या मागचे कारण समजले नाही.

## देवकाऱ्याला गेल्यावर चोरट्याने रक्कमेसह मोबाईल पळवला

**सोलापूर** : देवकार्याला गेल्यावर अज्ञात चोरट्याने फायदा घेऊन घराच्या हॉलच्या ढकललेल्या कळीकोंडा न लावलेल्या दरवाज्यातून आत प्रवेश करून मोबाईलसह रोख रक्कम असा एकूण ३१ हजार ८०० रुपयांचा ऐवज सोडून नेल्याची घटना हुच्चेश्वरनगर भाग-३ कल्पना म्हेत्रे वस्ती येथे घडली. याप्रकरणी रघु कुरमन्ना केंचे (वय-३४, रा.सध्या - मेगाहिल्स, मादापूर, राज्य तेलंगणा) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.